# राशिभविष्य - जून, २०१७.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

==========================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळींचा वर्तमान स्वभाव अतिशय चंचल, अस्थिर, लहरी असा झाला असावा, असे वाटते. तसे असेल तर मनाविरुद्ध थोडे काहीही घडले, किंवा कोणी उपदेशाच्या चार गोष्टी सांगितल्या तरी ते अपमानकारक वाटून सहन होत नसावे, असे वाटते. या राशीची लहान मुले तर सध्या अतिशय वांड, व्रात्य, हूड अशा प्रकारची झाली असावीत, असे वाटते. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळीना नोकरीत महिन्याचा पूर्वार्ध प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. शिवाय आप्तेष्ट भांडणे, वाढता खर्च, होणारी आर्थिक फसवणूक , होणारे आर्थिक नुकसान अशापैकी कारणांनी त्रस्त व्हाल. त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून डोळे तळावणे, खाजणे, व अन्य कारणांनी डोळ्याची दुखणी त्रस्त करतील. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या राहूमुळे काहीही कारणाने या राशीच्या मंडळींच्या संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. मात्र हा राहू कमिशन, दलाली व्यवसाय असणारांना लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात वक्री शनिमुळे अपेक्षाभंग होणे, एखादा लवकर बरा न होणारा आजार होणे, असलेल्या कर्जात वाढ होणे अशापैकी मनस्ताप देणाऱ्या घटना घडणे संभवते. जपा. पूर्वार्धात प्रवासयोग संभवतो. कुमार्गी सहकारी, मित्र यांच्यापासून दूर राहा. नुकसान होईल. जपा. आर्थिक चिंता वाढवू नका. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या नोकरदार मंडळीना नोकरीत मनोनुकुल घटना घडत असल्याचा अनुभव येईल. गुरु ग्रह अनुकुल असल्याने सर्वांगीण आरोग्य उत्तम राहील. काहींना वेतनवाढ मिळेल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना बढती, काहीना मानाचे स्थान असे काही मिळू शकेल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना सात्विक सुखशांती देऊ शकेल. दररोज नियमितपणे " श्रीगणेश अथर्वशीर्षा" चे पठण करा.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ मनस्ताप देणारा असा असल्याचाच अनुभव येईल. या राशीच्या युवकांना हातचे सोडून नवीन काही करण्याचा मोह होईल; पण त्यांनी मनावर संयम ठेवून कोणत्याही मोहाला बळी न पडता आहे ती नोकरी किंवा व्यवसायच करत राहावा, असे आवर्जून सांगावेसे वाटते. नोकरी असो वा व्यवसाय असो, सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते. असे अनुभव आल्यास निराश न होता नम्रतेचे आचरण करा. " "महा पुरे झाडे जाती , तेथे लव्हाळे वाचती " हे तुकोबांचे वचन आचरणात आणा. त्यामुळे शारीरिक-मानसिक आरोग्य फारसे बिघडणार नाही. प्रतिकुल काळ विरून गेल्यावर मनासारखे सर्व ते घडणारच ! यावर विश्वास ठेवा. आर्थिक जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी काही मंडळीना अपार कष्ट करावे लागतील. देणे द्यावेच लागेल; पण येणे वसूल होणे जमणार नाही. त्यामुळे आर्थिक चिंता अस्वस्थ करतील. जपा. काही मंडळीना आर्थिक नुकसानीचा तर काहींना आर्थिक फसवणुकीचा फटका बसेल. जपा. शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकाराचा आजार त्रस्त करील. नेत्रविकार, घसा, दाढा, मान यांचे दुखणे अशापैकी आजार होणे संभवते. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी तर विशेष जपले पाहिजे. त्यात भर म्हणून घरी आप्तेष्ट मंडळींशी भांडणे, वाद होणे संभवते. जपा. जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे अपेक्षित वैवाहिक जीवनातील सुखातही बाधा येणे संभवते. त्यामुळे काहींना कुसंगतीची बाधा होणे संभवते. जपा. केवळ

मानसिक आजार तज्ञ व द्रव पदार्थांचे व्यापारी यांनाच काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. शुभ ग्रह गुरु खूपच अनुकुल असल्याने संततिसुख लाभेल, प्रेमसंबंध वाढतील, या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. शुक्रामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धेने श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने अनुकुल नाही असेच म्हणावे लागेल. रवि-मंगळ-शनि हे महत्त्वाचे ग्रह प्रतिकुल असल्याने नोकरी-व्यवसायात मनस्ताप देणाऱ्या घटना घडतील. त्यामुळे काही मंडळीना गहरे नैराश्य येणे संभवते. आपल्या अहंकारी, हेकट, हट्टी स्वभावाला लगाम घालू शकलात व जिभेला लगाम घालून सतत नम्रतेचे आचरण करू शकलात तर खूपच सुखाचे होईल. या राशीच्या मंडळीना आध्यात्मिक उपासनेस काळ अनुकुल आहे. यास्तव कुलदैवताची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. अशा मनापासून केलेल्या उपासनेमुळे काही भाग्यवान मंडळींना सूचक स्वप्ने पडतील. या राशीच्या सप्तम स्थानी असलेला वक्री शनि ग्रह महिनाच्या पूर्वार्धात आपल्या व आपल्या जीवनसाथीच्या अनारोग्यास कारणीभूत होईल. काहींना कुसंगतीची बाधा त्रस्त करील. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावर मनस्तापदायक ठरेल. काहींना लोकापवाद सहन करावे लागतील. आपल्याबद्दल विकृत मते बनवील. जपा. पण चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्रास अनुकुल व पूरक होईल. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे गृहसौख्य लाभेल. पण नातेवाईक मंडळींपैकी कोणाचा तरी त्रास सहन करावा लागेलसे दिसते. या राशीची काही मंडळी स्थावर खरेदी करू शकतील; तर काही विक्री करू शकतील. राहूमुळे काही मंडळीच्या बंधुसुखात बाधा येईल; तर काहींना कोर्ट प्रकरणाशी मुकाबला करावा लागेल. रवि-मंगळ शारीरिक-मानसिक आरोग्य बिघडवण्यास कारणीभूत होतील. नोकरी-व्यवसायात प्रतिकुल परिस्थिती निर्माण करतील. पण गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. काही भाग्यवान मंडळीना तर परदेशगमनाची संधीही मिळू शकेल. कुलदैवतासह श्रीहनुमान उपासना करा. मन:शक्ती प्राप्त होईल.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. या राशीच्या नोकरदार मंडळीना नोकरीत महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याचा उत्तरार्ध मात्र मनस्ताप देणारा असाच असेल. आर्थिक समस्या त्रस्त करतील. कुटुंबात वाद, भांडणे होतील. जीवनसाथीला खूप कष्ट होतील. वक्री शनि ग्रहामुळे कोळसा, लोखंड व्यवसाय आणि यांत्रिकतांत्रिक व्यवसायात अडथळे, अडचणी निर्माण होतील. शिवाय अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेल. त्वचा रोग, मुखदंत रोग, रक्तविकार अशापैकी आजार त्रस्त करतीलसे दिसते. काही मंडळीना कुसंगतीची बाधा होईल. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात मुलांपैकी कोणास कसला तरी मानसिक त्रास त्रस्त करील, तर कोणास शारीरिक अनारोग्य त्रस्त करील. त्यामुळे अपेक्षित संततिसुखात बाधा येणे संभवते. भावंडाकडून त्रास झाल्यास गृहसौख्यात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या लेखकांचे साहित्य ग्रंथरूपात प्रसिद्ध होईल. काहींना प्रवासाचे योग येतील. महिन्याच्या उत्तरार्धात रवि-मंगळ प्रतिकुल होणार असल्यामुळे मन अस्वस्थ राहील. काही मंडळीना आर्थिक चिंता त्रस्त करतील. काहींना गहरे नैराश्य येईल.

काही जुनी दडपली गेलेली प्रकरणे असतील तर ती पुन्हा उकरली जाऊन त्यांचा असह्य मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. जपा. अपघात भय असल्याने सतत सावधानतेने आचरण करा. या राशीच्या मंडळीना शिवोपासना अनुकुल होईल व मन:शांती मिळेल. म्हणून या राशीच्या मंडळींनी " ओम नम: शिवाय " मंत्राचा सतत जप करावा, असे आग्रहाने सांगावेसे वाटते.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ खूपच अनुकुल होणार असून त्याचा पूर्णपणे लाभ घेता यावा यासाठी शारीरिक मानसिक आरोग्य उत्तम राखता आले पाहिजे. कारण या महिन्याच्या काळात शारीरिक-मानसिक आरोग्य बिघडण्याची शक्यता जाणवते. वातविकार बळावण्याची अधिक शक्यता आहे. शिवाय मनस्ताप देणाऱ्या घटना घडल्यास मानसिक अनारोग्य होणेही संभवते. त्यामुळे अनुकुल काळ गमावला गेला तर "दैव देते, कर्म नेते" अशी अवस्था होईल. म्हणून आपल्या अहंकारी स्वभावाला लगाम घालून, सहनशील बनून आचरण केलेत तर अनुकुल काळाचा सदुपयोग करणे शक्य होईल. या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना बढती, वेतनवाढ असे लाभ होणे संभवते. काहींना एखादे मानाचे स्थान वा उच्च पद मिळणेही संभवते. पण खाजगी नोकरदार मंडळीना मात्र कष्ट-परिश्रम करूनच अपेक्षित अर्थलाभ प्राप्त करून घ्यावा लागेल. लाभस्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे काहीही कारणाने मैत्रीत वितुष्ट निर्माण होणे संभवते. उलट याच मंगळ ग्रहामुळे काही मंडळींना मौल्यवान गोष्टींचा लाभ होणेही संभवते. धनस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे आर्थिक प्रगती, अर्थ लाभ होतील. कुटुंबात शुभ घटना घडतील. व्यावसायिकांच्या व्यवसायात वाढ होईल. काहींना कर्जफेड करणेही शक्य होईल. भाग्यस्थानी असलेल्या हर्शल ग्रहामुळे शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यमग्न असणारांना संशोधन कार्यात अपेक्षित प्रगती करणे शक्य होईल. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने मनोनुकुल घटना घडतील. पण शनि-नेपच्यून- केतू प्रतिकुल असल्याने वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे, कोर्ट प्रकरणात अपयश येणे संभवते. तसेच संततिसुखात व गृहसौख्यात बाधा येणे संभवते. जपा. कुलदैवताची उपासना मन:शांती देईल.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात उगीचच आपल्याला काही आजार झाला असल्याची भावना त्रस्त करील. त्याचप्रमाणे काल्पनिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. शिवाय फसवणूक झाल्याचा मनस्तापही सहन करावा लागेलसे दिसते. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याच्या पूर्वार्धात कामाचा ताण, वरिष्ठांची नाराजी सहन करावी लागेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात रवि
ग्रह दशम स्थानी आल्यावर परिस्थितीत आपोआप बदल होईल व सर्व काही मनासारखे घडेल. इच्छा-आकांक्षा पूर्ण होतील. मोठ्या मंडळींच्या ओळखी होतील व त्यांची मदत मिळून मनोकामना पूर्ण होतील. यांत्रिक तांत्रिक नोकरीव्यवसाय असणारांना, तसेच वैद्यकीय व्यवसाय व औषध विक्रेते यांना संपूर्ण महिन्याचा काळ प्रगतिकारक व लाभदायक होईल. जन्मकुंडलीत शुक्र ग्रहाची स्थिती असेल तर वर्तमान शुक्रही लाभदायक होईल. महिन्याच्या पूर्वार्धात वक्री शनि मुळे गृहसौख्यात बाधा येणे संभवते; पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात कौटुंबिक सुख लाभेल व मन प्रसन्न राहील. व्यय स्थानी असलेल्या राहूमुळे हितशत्रू पराभूत होतील. काही मंडळीना परदेशगमनाची संधी मिळेल. पण हाच राहू वैवाहिक जीवनातील सुखात बाधा आणू शकेल. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात वक्री शनि या

राशीच्या तृतीय स्थानी गेल्यावर एखादी भावंडविषयक चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. पण या राशीच्या काही युवकांना मनासारखी नोकरी वा आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. प्रथम स्थानी असलेल्या बौद्धिक राशीतील गुरु ग्रहामुळे बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणाराना तसेच साहित्यिकांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल , यशदायक व मनेप्सित पूर्ण करणारा असा सिद्ध होईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ भौतिक सुखाचे दृष्टीने प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. पण सात्विक सुख शांतीसाठी आध्यात्मिक उपासनेस काळ खूपच अनुकुल आहे. गुरु-नेपच्यून हे ग्रह अध्यात्म प्रगतीस अनुकुल आहेत. म्हणून दैनंदिन येणाऱ्या कटू अनुभवांमुळे उदास, निराश न होता मन:शांतीसाठी आध्यात्मिक उपासना करा, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. तसेच ज्यांना सामाजिक कार्याची मनापासून आवड असेल त्यांना अशा समाजसेवेच्या कार्यात यश मिळू शकेल व त्यामुळे एक आगळेच सुखसमाधान लाभेल. पण जीवनाच्या अन्य सर्व क्षेत्रात प्रतिकुल परिस्थितीलाच तोंड द्यावे लागणार आहे, त्यामुळे शारीरिक-मानसिक आरोग्यावर परिणाम होणे संभवते. भावनेच्या भरात नको तिथे भरकटत जाणे संभवते. जपा. नोकरी -व्यवसायात सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडतील. काही मंडळींना आर्थिक समस्या त्रस्त करतील. काही मंडळींच्या कुटुंबात अनिष्ट घटना घडणे संभवते. कोर्ट प्रकरणे असतील तर त्यांचा असह्य त्रास सहन करावा लागेलसे दिसते. जीवनसाथीचे लहरी, विक्षिप्त आचरण, दोघांमधील गैरसमज, वाद अशापैकी कारणांनी अपेक्षित वैवाहिक जीवनातील सुखातही बाधा येणे संभवते. जपा. नोकरीतील अधिकाराचा गैर उपयोग करून वाम मार्ग धनाची अपेक्षा होत्याचे नव्हते करील. जपा. काही मंडळींच्या संततिसुखात विविध कारणांनी बाधा येणे शक्य दिसते. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे, अडचणी येणे संभवते. काहींना भावंड विषयक समस्या त्रस्त करील. मन:शांतीसाठी कुलदैवताची उपासना व मन:शक्तीसाठी श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ कौटुंबिक सुखाचे दृष्टीने व गृहसौख्याचे दृष्टीने प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. काही मंडळींच्या कुटुंबात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता दिसते. काहींना कोर्ट प्रकरणाचा त्रास सहन करावा लागेल; तर काहीना आर्थिक चिंता त्रस्त करतील. महिन्याच्या उत्तरार्धात स्वत:चे व जीवनसाथीचे अनारोग्य, कुटुंबात कोणाचे तरी होणारे स्थलांतर नियोजित कार्यात येणारे अडथळे , घरगुती परिस्थितीत गैरसमज , कोणाशी न पटणे , होणारे घोटाळे, त्यामुळे येणारे नैराश्य अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुखात, गृहसौख्यात व वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने काळ अनुकुल होईल. बौद्धिक व शास्त्रीय संशोधन नोकरी-व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. काही मंडळींना अधिकारपद मिळेल; तर काहींचा सन्मान होईल. यांत्रिक तांत्रिक नोकरी-व्यवसाय, वैद्यकीय व्यवसाय, औषधविक्रेते, कलात्मक नोकरी-व्यवसाय असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक भोईल. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे मनस्थिती चंचल व लहरी होईल. काही मंडळीना डोकेदुखीचा त्रास होईल, तर काहींना मेंदूविकाराचा आजार त्रस्त करील. काहींना मुदतीच्या तापाचा आजार त्रस्त करील. जपा. महिन्याचा अखेरचा साप्ताह मनोनुकुल घटना घडत जातील आणि दिलासा मिळेल. लाभस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे संततिसुख लाभेल.

तसेच या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना आणि श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती मिळेल.

**(९) धनु -** वक्री शनि ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडतील. त्यामुळे संतापून न जाता मनावर व विचारशक्तीवर ताबा ठेवून , सहनशील बनून व नम्रतेचे आचरण करून प्रतिकुल काळ व्यतीत करणेच सुखाचे होईल. नपेक्षा शारीरिक-मानसिक अनारोग्य होईल, गहरे नैराश्य येईल. जपा. या काळात सर्व आर्थिक व्यवहार सावधानतेने, काळजीपूर्वक, फसवणूक होणार नाही याची काळजी घेऊनच करा. अकारण मानहानी होणे संभवते. पण मौन व्रत धारण करा. तरच होणारा मनस्ताप सुसह्य होईल. काहींना कोर्ट प्रकरणाचा असह्य मनस्ताप होणे संभवते. या राशीच्या नोकरदार मंडळींना नोकरीत महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. नियोजित कार्यात सफलता प्राप्त होईल. काहींना अर्थलाभ तर काहींना कीर्तिलाभ होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात काही मंडळींना अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेल. काहींना पोटविकार त्रस्त करतील. राहूमुळे घरात वाद, भांडणे होणे संभवते. संततिसुखात बाधा येणे संभवते. कलात्मक व्यवसाय असणारांना व उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. काहींना नवे कार्यक्षेत्र प्राप्त होईल. अध्यात्माची आवड असणारांना आध्यात्मिक साधनेद्वारे
मन:शांती मिळू शकेल. काही भाग्यवान मंडळींना जलप्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज नियमितपणे बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा उत्तरार्धच नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण त्यासाठी महिन्याच्या पूर्वार्धात सतत मनावर संयम ठेवून, मतप्रदर्शन न करता, सहनशील बनून आचरण करता आले पाहिजे. कारण महिन्याच्या पूर्वार्धात सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता जाणवते. या काळात सर्व आर्थिक व्यवहार विचारपूर्वक व सावधानतेने करा. कसल्याही मोहाला बळी पडू नका. काही मंडळीना कोर्ट प्रकरणांचा असह्य मनस्ताप होणे संभवते. जपा. काहींना अकारण मानहानी सहन करावी लागण्याची शक्यता दिसते. जपा. मनस्तापामुळे काही मंडळीना शारीरिक अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेल; तर काहींना गहरे नैराश्य येणे संभवते. जपा. अस्वस्थ मनस्थितीमुळे आहे त्या परिस्थितीत सुखशांती लाभणार नाही. स्वभाव तक्रारखोर होईल. कोणाशी पटणार नाही. गृहसौख्य लाभणार नाही. जपा. नोकदार मंडळींना नोकरीत कामाचा ताण, वरिष्ठांकडून होणारी मानहानी सहन करावी लागेल. महिन्याच्या उत्तरार्धात रवि - शनि ग्रह काही प्रमाणात अनुकुल होतील त्यावेळी नोकरीत परिस्थितीत बदल होईल व मनोनुकुल घटना घडतील. कोळसा , लोखंडी
सामानाचे विक्रेते, यांत्रिक तांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारे, वैद्यकीय व्यवसाय असणारे व औषध विक्रेते अशा सर्वांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. शुक्र ग्रहाच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे व जन्मकुंडलीतील योगानुसार काहींना शेतीवाडीपासून लाभ होईल, काहींना ऐशारामाची साधने प्राप्त होतील, तर काहींना गृहसौख्य लाभेल. भाग्यस्थानी

असलेल्या गुरु ग्रहामुळे अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती साधने शक्य होईल. काहींना प्रवासाचे योग येतील. पण शनी-राहूमुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. जपा. श्रद्धेने श्रीहनुमान उपासना करा. दररोज नियमितपणे " हनुमानचालिसा " स्तोत्राचे पठण करा

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळींचे मन अत्यंत कोमल झाले असल्याचे जाणवते. तसेच मानसिक संवेदनाही अति शीघ्र होत असाव्यात असे वाटते. तसे असेल तर थोडे काही मनाविरुद्ध घडले तर लगेच मनस्थिती उदास होत असावी व गहरे नैराश्य येत असावे. पण प्रथम स्थानी असलेल्या केतूमुळे काही मनोनुकुल घटना घडतील; तरीही हा केतू वाहन अपघात सुचवतो. तेव्हा सावधानतेने वाहन चालवा, वाहन चालवताना मोबाईलवर संभाषण करू नका. रस्त्याने चालत जाताना सतत सावध राहून व वाहतुकीकडे लक्ष देऊनच चालत राहा. या राशीच्या नोकरदार मंडळीना संपूर्ण महिन्याचा काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. पण वैद्यकीय व्यवसाय, औषधी संशोधन , औषध विक्रेते, यांत्रिक तांत्रिक नोकरीव्यवसाय असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ बरा जाईल. या राशीच्या व्यापाऱ्याना स्त्री ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या काही भाग्यवान मंडळीना परदेशगमनाची संधी मिळेल. मनात विकृत विचार येणे संभवते. पण असे विचार आले तर ते लगेच झटकून टाका. वाममार्ग धन मिळविण्याचा विचारही मनातून काढून टाका. वैवाहिक जीवनात दोघातील वाद, गैरसमज, तसेच दोघांपैकी कोणाचे अनारोग्य अशापैकी कारणानी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. जर जन्मकुंडलीत योग असेल तर या राशीच्या असा योग असणाऱ्या काही मंडळीना अचानक धनलाभ किंवा वारसाहक्काने धनलाभ होणे संभवते. श्रद्धा असेल तर शिवोपासना आणि श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(१२) मीन -** या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. वरिष्ठ तुमच्या कर्तृत्वाची प्रशंसा करतील, काहींना बढती, वेतनवाढ, तर काहींना एखादे उच्च पद वा मानाचे स्थानही मिळू शकेल. म्हणून त्यांनी जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. कारण महिन्याचा उत्तरार्ध घरीदारी सर्व ठिकाणी प्रतिकुल परिस्थिती निर्माण होणे व मनस्ताप देणाऱ्या घटना घडणे संभवते. सध्या या राशीच्या मंडळींचा स्वभाव अतिशय चंचल , अस्थिर व लहरी झाला असावा, असे वाटते. अशा परिस्थितीत मनावर संयम ठेवून, जिभेला लगाम घालून व सहनशील बनून आचरण करणेच सुखाचे होईल. नपेक्षा आपल्या फटकळ बोलण्याने इतरांची मने दुखावली जाऊन प्रेमाचे, मैत्रीचे संबंध दुरावतील. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेला मंगळ ग्रह व महिन्याच्या उत्तरार्धात त्याच स्थानी येणारा रवि ग्रह कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. नियोजित कार्यात येणारे अडथळे, अडचणी, कोणाला राहत्या जागेची समस्या त्रस्त करील; तर कोणाला स्थावरसंबंधी समस्या त्रस्त कारीलसे दिसते. शिवाय आर्थिक समस्या , अनारोग्य यामुळेही असह्य मनस्ताप होणे संभवते. जपा. पण या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे नवे स्नेहसंबंध निर्माण

होण्याची शक्यता आहे. तसेच असलेल्या प्रेमसंबंधात वाढ होणे संभवते. या राशीच्या विवाहेच्छू युवक युवतींचे विवाह ठरतील. काहींना प्रवासयोग संभवतो. धनस्थानी असलेल्या शुक्र ग्रहामुळे कुटुंबात काही सुखद घटना घडतील, धनलाभ होणेही संभवते.
त्यामुळे प्रतिकुल काळ सुसह्य होईल. श्रद्धेने श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दरोज नियमितपणे “ बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

=====ooooo0ooooo=====